# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
## वनशास्त्र महाविद्यालय,
दापोली, ४१५ ७१२, जि.रत्नागिरी (महाराष्ट्र)

डॉ. ए. डी. राणे
पीएच्.डी
सहयोगी अधिष्ठाता

मोबाईल – ९४२११८६७३५
फॅक्स नं. – ०२३५८.२८३६५५
इमेल: assodeanfor@rediffmail.com

जा.क्र.वमवि/RKVY/ 840 /२१

दिनांक: 25 AUG 2021

## परीपत्रक

वनशास्त्र महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या अगरबत्ती प्रकल्पाचा लाभ घेण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपनी कडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज व त्यासाठी आवश्यक सर्व कागदपत्रांची छायांकित प्रत खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत दि. ३०/०९/२०२१ रोजी संध्याकाळी ५. ३० पर्यत पाठवाव्यात.

वनशास्त्र महाविद्यालय, दापोली
डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
ता. दापोली, जि. रत्नागिरी – ४१५७१२ (महाराष्ट्र).
ई–मेल – assodeanfor@reediffmail.com

अजय द. राणे

Scanned with CamScanner

# वनशास्त्र महाविद्यालय, दापोली

## राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अगरबत्ती प्रकल्पांची माहिती व बांबू अगरबत्ती प्रकल्पासाठीचे निकष

वनशास्त्र महाविद्यालय, डॉ. बा. सा. कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत कोकणामध्ये ८ ठिकाणी २०२१—२३ मध्ये अगरबत्ती प्रकल्प स्थापन करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पासाठी लाभार्थी निवडण्यासाठी प्रक्रिया राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर योजनेची लाभार्थी निवडण्यासाठी खालीलप्रमाणे पध्दत वापरण्यात येणार आहे.

- प्रथम विहित नमुन्यामध्ये व कागदपत्रांसहित अर्ज मागविण्यात येणार आहेत.
- सदर प्राप्त अर्ज ठरलेल्या निकषाप्रमाणे छाननी करून निवडलेल्या लाभार्थींची मुलाखत घेण्यात येणार आहे.
- त्यानंतर समिती प्रत्यक्ष प्रकल्प उभारण्याच्या स्थळी भेट देऊन, चाचणी करून अहवाल सादर केल्यावर लाभार्थीची निवड प्रस्ताव विद्यापीठाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे मान्यतेसाठी देण्यात येईल.
- प्रकल्पाची माहिती खालीलप्रमाणे आहे...

एका प्रकल्पाची अंदाजित रक्कम रू. १०.०० लाख आहे. त्यामध्ये अगरबत्ती तयार करण्याची उपकरणे खरेदी करून लाभार्थ्यांनी निवड केलेल्या ठिकाणी स्थापित करण्यात येणार आहेत. लाभार्थ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत ५०% निधीच्या एवढे उपकरणे देण्यात येतील व उर्वरीत रक्कमेची उपकरणे लाभार्थींनी खरेदी करावयाची आहेत. सदर योजनेसाठी आवश्यक असणारी उपकरणे पुरविण्यासाठी विद्यापीठ ई—निविदा मागविणार आहे. व सर्व उपकरणे खरेदी करण्यासाठी एकच पुरवठादार असणार आहे. भविष्यातील उपकरणांची दुरूस्ती व व्यवस्थापनासाठी असे करणे सोईस्कर ठरेल.

अगरबत्ती प्रकल्पासाठी लाभार्थ्यींची निवड करण्याचे निकष खालीलप्रमाणे...

१. लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी (FPCL) असणे गरजेचे आहे.
२. शेतकरी उत्पादक कंपनीचे कार्यक्षेत्र बांबूप्रधान क्षेत्र असणे गरजेचे आहे.
३. शेतकरी उत्पादक कंपनी (FPCL) चे बांबुवरील कार्य व अनुभव असावा.
४. सदर शेतकरी उत्पादक कंपनी (FPCL) मध्ये बांबू आधारीत व्यवसाय करणारे/बांबू प्रक्रियेवर आधारीत व्यवसाय करून त्यावरील उत्पन्नावर निर्भर असणारे/वनशास्त्र पदवीधारक/सभासद असणे आवश्यक आहे.
५. प्रकल्पाचे ५०% निधी उभारण्यासाठी बॅकेची हमी देणे आवश्यक आहे.
६. प्रकल्प उभारण्यासाठी ईमारत व त्यामध्ये ३ फेज चा वीज पुरवठा असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

(कृ.मा.प.)

Scanned with CamScanner

संपुर्ण प्रकल्प चालवण्याचे प्रशिक्षण, उपकरणांची देखभाल संबंधी माहीती व तयार मालाचे विक्रीचे नियोजन करून प्रकल्पाची व्यावसायिक कार्यक्षमता विकसित करण्यासाठी वनशास्त्र महाविद्यालयाचे शास्त्रज्ञ मदत करतील.

त्यासाठी वनशास्त्र महाविद्यालय, दापोली आणि लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये सामंजस्य करार करण्यात येईल.

वैयक्तिक अर्ज स्वीकारले जाणार नाही. सदर अर्ज शेतकरी उत्पादक कंपनी मार्फतच स्वीकारण्यात येतील.

********

Scanned with CamScanner

# वनशास्त्र महाविद्यालय, दापोली,
# जि. रत्नागिरी.

## राष्ट्रीय कृषी विकास योजना

## बांबू अगरबत्ती प्रकल्पासाठी करावयाचा अर्ज नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | शेतकरी उत्पादक कंपनीचे नाव | |
| २ | संपुर्ण पत्ता | |
| ३ | भ्रमणध्वनी क्र. | |
| ४ | ईमेल | |
| ५ | संचालक/प्रकल्प संबंधीत व्यक्तीची संपुर्ण माहिती | |
| ६ | बंबू प्रक्रिया/लागवडी/अभिवृध्दीचे अनुभव | |
| ७ | ईमारतीची माहिती | |
| | अ) क्षेत्र:<br>ब) ३ फेज विजपुरवठा आहे का?:<br>क) ईमारतीचा ७/१२:<br>ड) गाव:<br>ई) तालुका/जिल्हा: | |
| ८ | पॅनकार्ड क्र. | |
| ९ | GST नं. | |
| १० | बॅक खाते नं:<br>बॅकेचे नाव:<br>IFSC Code: | |
| ११ | वनशास्त्र पदवीधर/बांबू प्रक्रियाधारक/बांबू आधारीत व्यवसाय करणार असल्याचे नाव व पत्ता | |

अर्जासोबत जोडावयाचे दाखले

१. वनशास्त्र पदवी धारक/बांबू आधारीत व्यवसाय करणारे/बांबू प्रक्रिया हा उपजीवीकेचे प्रमुख साधन असणाऱ्या व्यक्तीचा दाखला व सदस्य असल्याचे प्रमाणपत्र.

२. ईमारतीचे कागदपत्र
   अ) सात/बारा वर नोंद
   ब) विज बील

३. थ्री फेज असल्याचे प्रमाणपत्र.

४. संस्थेचे कागदपत्र
   अ) नोंदणी प्रमाणपत्र
   ब) पॅनकार्ड क्र.
   क) GST नं
   ड) सदस्याची यादी
   इ) तीन वर्षाचा आयकर परतावा
   ई) पाच लाखाची बॅक हमी

*१.अर्ज वनशास्त्र महाविद्यालय, दापोली, डॉ. बा. सा. कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी–४१५७१२, येथे पाठवावा.

********

Scanned with CamScanner